ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | July 2019 Issue-55, Vol-02 | 0132

डॉ.दीपाक्षीरसागर, स्नेहवर्धक प्रकाशन पुणे.

३) संत साहित्यातील मिथकांचे रहस्य - डॉ.कल्पलता नातू, सायन पब्लिकेशन्स, प्रा.लि.पुणे

❑❑❑

29

# कृषी विकासात भूमी साधनांचे महत्त्व

प्रा. डॉ. संजय तळतकर
महिला महाविद्यालय गेवराई, जि. बीड

**********

**प्रस्तावना :—**

भूमी किंवा जमीन ही मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासात भूमिला अत्यंत महत्त्व आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात तर भूमिला काही वेगळेच महत्त्व आहे भूमी हे भारताच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख अंग आहे. भारतातील ७० टक्के लोकांना शेतीच्या माध्यमाने रोजगार पुरविण्याचे कार्य भूमी करीत आहे. तसेच देशातील १०० कोटी लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी भूमिच पार पाडीत आहे. तसेच एवढ्य लोकांच्या आश्रयासाठी बांधण्यात आलेली घरे भूमिवरच उभारली आहेत. सार्वजनिक संस्था, कार्यालये, धर्मादाय संस्था, सामाजिक सेवा संस्था, शैक्षणिक संस्था इत्यादिंचा इमारती उभारण्यासाठी भूमिचाच आधार (उपयोग) घ्यावा लागतो. देशात वाहतुकीच्या साधनांचा विकास करण्यासाठी रस्ते, सडका, रेल्वे इत्यादींची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी सुध्दा जमिनीचाच उपयोग करावा लागतो. भूमिचा काही भाग जंगलाने व्यापलेला आहे. जंगलापासून इमारतीसाठी लागणारे लाकूड प्राप्त होते तसेच पाऊस पडण्यासाठी मदत होते.

भारतात विविध कार्यासाठी भूमिचे महत्त्व असले तरी सर्वात जास्त महत्त्व शेतीसाठी आहे. भारतात सर्वात जास्त भूमिचा उपयोग शेतीसाठी केला जातो.

**भारतातील भूमी साधन :—**

भारतातील एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३२.८८ कोटी हेक्टर म्हणजे ३२,८७,७८२ वर्ग किलोमिटर आहे. भारताचा पूर्व व पश्चिम विस्तार २,९३३ किलोमिटर असून उत्तर ते दक्षिण विस्तार ३,२१४

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | July 2019 Issue-55, Vol-02 | 0133

किलो मिटर आहे. भारतातील भू—सिमेची लांबी १५,२०० किलोमिटर असून समुद्र किनाऱ्याची लांबी ६,०८३ किलोमिटर आहे. भारताचे क्षेत्रफळ संपूर्ण जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४ टक्के आहे. या विशाल भूखंडालाच उप—महाद्विप असे म्हटले जाते. भारताचे क्षेत्रफळ इंग्लंडच्या १३ पट तर जपानच्या ८ पट आहे. इतकेच नव्हे तर इंग्लंड, फ्रान्स, आयरलँन्ड, डेन्मार्क, जर्मनी, ऑस्ट्रीया, हंगेरी, स्पेन या आठ देशांचे जेवढे क्षेत्रफळ आहे तेवढे क्षेत्रफळ एकट्या भारताचे आहे. यावरून भारताचे क्षेत्रफळ इतर देशाच्या तुलनेत बरेच जास्त आहे असे दिसून येते. परंतु असे जरी असले तरी भारताचे क्षेत्रफळ काही देशाच्या तुलनेत कमी आहे. उदा. भारताचे क्षेत्रफळ अमेरिका, कॅनडा व या देशाच्या १/३ तर रशियाचा १/७ आहे.

**१) भूमिचा उपयोग :—**

भूमी हीच देशाची सर्वात महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती आहे. शेतीचा व शेती उत्पादनाचा मुख्य आधार म्हणून भूमिला विशेश महत्त्व आहे. परंतु 'भूमी' या नैसर्गिक साधनाचा पुरवठा अत्यंत मर्यादित आहे. तद्वतच निसर्गाने मानवाला जेवढी भूमी उपलब्ध करून दिली त्यापैकी बरीचशी भूमी जंगले, नद्या, समुद्र व पर्वत यांनी व्यापलेले असून भूमिचा काही भागच शेती करण्यायोग्य आहे. देशातील लोकसंख्या जसजशी अधिकाधिक वाढू लागते तसतसा शेतीयोग्य जमिनीचा गैरशेती कामाकरिता वापर करणे आवश्यक ठरते. लोकसंख्येच्या वाढीबरोबरच घरांची मागणी वाढते. त्यामुळे शेतीयोग्य जमिनीचा काही भाग घरे बांधणीकरिता वापरणे भाग पडते. लहान—लहान गावाचे रूपांतर शहरात होते. व शहरांचा आकार दिवसेंदिवस वाढत जातो. त्यामुळे रस्ते, बगीचे व मैदान यासाठी देखील जमिनीची आवश्यकता पडते. पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी तलाव, बांध, कालवे इत्यादी तयार करावे लागतात. त्यात देखील उपजाऊ जमिनीचा बराच भाग नष्ट होतो. लोकसंख्येच्या वाढीबरोबरच सार्वजनिक सेवा संस्था कार्यालये, दवाखाने, शैक्षणिक संस्था, क्रिडा संस्था, मनोरंजन संस्था, कारखाने, उद्योग इत्यादीत वाढ होते. या संस्थांसाठी बऱ्याच जमिनीची आवश्यकता असते. तसेच रस्ते, वाहतूक, रेल्वे, हवाई वाहतूक इत्यादी दळणवळणाच्या साधनांचाही विकास होतो व त्यासाठी देखील शेतीयोग्य जमिनीचा बराच भाग उपयोगात आणावा लागतो.

वरील सर्व विकास कार्यासाठी जमिनीचा फार मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो. त्यामुळे शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ कमी होण्याची शक्यता असते. म्हणून वरील विविध कार्यासाठी जमिनीचा वापर करतेवेळी शेतीयोग्य जमिनीचा भाग नष्ट होणार नाही यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशा प्रकारचे प्रयत्न करण्यासाठी देशात एंकदर किती जमीन आहे? तिचा वापर कोणकोणत्या कामासाठी केला जातो? शेतीयोग्य जमीन किती आहे? पडीत जमिनीपैकी किती जमिन लागवडीखाली उपलब्ध होऊ शकते? इत्यादी संबंधिची माहिती पाहणे आवश्यक आहे.

**भूमी उपयोगाचा अर्थ :—**

'भूमी—उपयोग म्हणजे देशातील एंकदर भौगोलिक क्षेत्रफळाचा वेगवेगळ्या कार्यासाठी उपयोग करून घेणे होय.' भूमी उपयोगात कोणत्याही देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ वेगवेगळ्या उपयोगासाठी कशाप्रकारे विभक्त झाले आहे? भूमिचा किती भाग शेतीसाठी वापरला जातो? किती भाग शेती करण्यास अयोग्य आहे? आणि जंगले, सडका, रेल्वे व इमारती इत्यादींना किती भूमी व्यापलेली आहे? याकडे विशेष लक्ष दिले जाते.

**भूमी उपयोगाचे महत्त्व :—**

कोणत्याही देशातील शेतीचा विकास हा त्या देशातील किती भूमी शेतीकरिता वापरली जाते व त्या भूमिचा कशाप्रकारे उपयोग केला जातो यावर अवलंबून असतो. म्हणून शेतीच्या विकासात भूमी उपयोगाला विशेष महत्व आहे. भारतात भूमी—उपयोगाचे महत्त्व कया आहे हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल.

**१) उत्पादन :—**

उत्पादन व भूमिचा उपयोग यात अत्यंत निकटचा संबंध आहे. उत्पादनात वाढ करण्यासाठी भूमिचा परिपूर्ण उपयोग करणे आवश्यक आहे.

**२) स्थिर भांडवल :—**

भूमी ही निसगनि मानवाला विनामूल्य दिलेली देणगी आहे. शेती कार्यासाठी भूमी उपलब्ध असणे

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | July 2019 Issue-55, Vol-02 | 0134


आवश्यक आहे. परंतू भूमिचा पुरवठा स्थिर आहे. त्यात घट किंवा वाढ करता येत नाही. त्यामुळे शेतीच्या विकासाकरिता भूमिचा परिपूर्ण व क्षमतेनुसार उपयोग करणे आवश्यक आहे.

**३) नियोजित वापर :—**भूमी हे भारतातील बहुसंख्य लोकांचे उपजिवीकेचे साधन आहे. परंतु भूमिचा पुरवठा मर्यादित आहे. लोकसंख्येच्या वाढीबरोबर दरडोई शेतजमिनीचे प्रमाण कमी—कमी होत आहे. त्यामुळे कोणत्याही भूमिचा उपयोग हा अत्यंत काळजीपूर्वक व योजनाबध्द पध्दतीने करावयास हवा.

**भूमी उपयोगाचे वर्गीकरण :—**

भारताचे एकंदर भौगोलिक क्षेत्रफळ ३२.८८ कोटी हेक्टर आहे. त्यापैकी ३०.४३ कोटी हेक्टर जमिनीच्या वर्गीकरणाची आकडेवारी उपलब्ध आहे. म्हणजे एकूण भौगोलिक क्षेत्राफळापैकी ९२.५ टक्के जमिनीच्या वर्गीकरणाची आकडेवारी उपलब्ध आहे. १९४९—५० मध्ये ८३.८ टक्के जमिनीची वर्गीकश्त आकडेवारी उपलब्ध होती. हाचा अर्थ स्पश्ट आहे की, भूमी उपयोगाच्या वर्गीकरणात हळुहळु प्रगती होत आहे. तरीपण अजूनही ७.५ टक्के जमिन अवर्गीकृत आहे.

**भारतातील भूमी उपयोगाचे वर्गीकरण १९७५—७६**



**स्पष्टीकरण :—**

**१) जंगलाचे क्षेत्र** —६.६४ कोटी हेक्टर जंगलाने व्यापलेले आहे. भारतातील जंगले अनेक प्रमुख व सहाय्यक उद्योगांना कच्चा मालाचा पुरवठा करतात. पाऊस पडण्याकरिता मदत करतात व भू—रक्षणापासून जमिनीचे संरक्षण करतात. जंगलाचा कटाईमुळे पावसाचे प्रमाण कमी होते व दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते म्हणून सध्याच्या २०.२ टक्के जंगलाखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावयास हवेत व ते ३३ टक्के पर्यत न्यावयास हवे.

**२) शेतीसाठी अनुपलब्ध भूमी :—** यामध्ये घरे, इमारती, कार्यालये, रेल्वे इत्यादी कामासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीचा समावेश होतो. तसेच यामध्ये नदीकाठची, टेकड्य—पर्वतांची, रेताळ वाळवंटाची, बंजर जमीन अशा शेती करण्यास अयोग्य समजल्या जाणाऱ्या जमिनीचा समावेश होतो. त्यात एकूण ४.३० कोटी हेक्टर जमीन गुंतलेली आहे. देशाच्या वाढत्या औद्योगिकरणामुळे गैरशेती कार्यासाठी वापरण्यात येणारी जमीन कमी करता येणार नाही. परंतु इतर कोणत्याच कार्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रफळात घट करणे आवश्यक आहे.

**३) पडीत जमीन इतर अकश्शीयोग्य जमीन :—** चराई कुरणे, झाडांची रोपटी, नर्सरी, बगीचे इत्यादी खालील जमिनीचा यात समावेश होतो. जमीन शेतीकरिता किंवा वृक्षारोपणाच्या कार्याकरिता उपयोगात आणता येवू शकते. परंतू लागवडी खालील क्षेत्रफळात या जमिनीचा समावेश केला जात नाही. अन्नधान्य व कृषी संघटनेने आपल्या वर्गीकरणात याच जमिनीला कृषीयोग्य जमिनीत समाविष्ट केले आहे.

**४) पडीत जमिन :—** ज्या जमिनीचा कोणत्याही कार्यासाठी उपयोग केला जात नाही. ती जमीन व्यर्थ पडून राहते अशा जमिनीचा यात समावेश होतो. भारतात अशी जमीन एकूण २.१० कोटी हेक्टर आहे. यापैकी बरीचशी जमीन शेतीयोग्य आहे. जमीनीवर मशागत करून ती लागवडीखाली आणणे आवश्यक आहे.

**५) पिकाच्या लागवडीखालील क्षेत्र :—** भारतात एकूण क्षेत्रफळापैकी ५२ टक्के जमीन (१७.११ कोटी हेक्टर) विविध पिकांच्या लागवडीखाली आहे. परंतू भारतातील वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास असे दिसून येते की, भारतात दरडोई लागवडीचे क्षेत्र इतर देशाच्या तुलनेत बरेच कमी आहे. १९७५—७६ मध्ये भारतात दरडोई लागवडीखालील क्षेत्र ०.२४ हेक्टर होते. तर अमेरिकेत ०.८९ हेक्टर, रशियात ९.३ हेक्टर, कॅनडात २.१२ हेक्टर व ऑस्ट्रलियात ३.३९ हेक्टर होते.

**६) एकापेक्षा अधिक वेळा लागवडीखाली**

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | July 2019 Issue-55, Vol-02 | 0135

असलेले क्षेत्रफळ :— जी जमीन एकापेक्षा अधिक वेळा लागवडीखाली आणली जाते परंतु नंतर अनेक कारणांमुळे ती अशीच सोडून देण्यात येते अशा जमिनीचा समावेश या वर्गात होतो. अशी जमिन ८.८ टक्के आहे व तिचे क्षेत्रफळ२.८९ कोटी हेक्टर आहे. ही जमिन २,४ वेळा लागवडीखाली आणल्या गेली आहे. परंतु नंतर ती जमीन शेतकऱ्यांचे दारिद्र, साधनांची कमतरता, पूरावा धोका, पाणी पुरवठ्याचा अभाव, खतांचा अभाव, अलाभकारी शेती इत्यादी कारणांमुळे पडीत ठेवण्यात येते. ही जमीन १ ते ५ वर्षेपर्यंत पडीत ठेवण्यात येते. या जमिनीवर योग्य ते प्रयत्न करण्यात आल्यास लागवडीखालील क्षेत्रफळात वाढ होवू शकते.

**भूमी उपयोगात सुधारणा करण्यासाठी उपाय :—**

देशातील वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची व रोजगाराची गरज लक्षात घेऊन भूमी उपयोगाच्या वर्तमान स्थितीत सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याकरिता पुढील उपाय सुचविण्यात येतात :—

**१) लागवडीखालील क्षेत्रात वाढ करणे :—** लागवडीखालील क्षेत्रात वाढ करावयाची असेल तर पडीत जमीन व कृषीयोग्य परंतु व्यर्थ पडून असलेली जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. भारतात पडीत जमीन २.२० कोटी हेक्टर व कृषीयोग्य व्यर्थ पडून असलेली जमिन १.७६ हेक्टर आहे. या दोन्ही प्रकारच्या जमिनी लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत परंतु असे प्रयत्न यशस्वी होण्याची शक्यता फार कमी आहे. कारण पडीत जमिनीपैकी जमिनीच्या बाबतीत असे आढळून येते की, ती जमीन लागवडीखाली आणावयाची असेल तर त्यावर फार मोठा खर्च करणे आवश्यक आहे आणि एवढा खर्च करण्यात आला तर ती जमीन आर्थिकदृष्ट्या परवडणार नाही. असा अंदाज व्यक्त केला जातो की कृषीयोग्य व्यर्थ पडून असलेल्या जमिनीपैकी फक्त २० लक्ष एकर जमिन लागवडीखाली आणता येऊ शकते म्हणून ही जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न करावयास पाहिजे.

**२) दुबार पिकांचे क्षेत्र वाढविणे :—** लागवडीखाली असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ वाढविता येण्याची शक्यता फार कमी असल्यामुळे सखोल शेतीचा अवलंब करून वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे आवश्यक आहे. भारतात नियोजन काळापासून विशेषत: तिसऱ्या योजनेनंतर हरितक्रांतीच्या रूपाने असे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे कृषी—उत्पादनात बरीच वाढ झाली. दुबार पिके घेण्यासाठी सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके औषधे, आधुनिक यंत्रसामुग्री व पाणी पुरवठा इत्यादी कृषी—आदानाच्या पुरवठ्यात वाढ केली पाहिजे.

**३) जमिनीचा शास्त्रशुध्द वापर :—** एखादी जमीन ज्या पिकासाठी सर्वात जास्त अनुकूल असेल अशाच पिकाची लागवड त्या जमिनीत केली पाहिजे. धान्य पिकविणाऱ्या जमिनीत जंगले वाढविणे, गवत पिकविणे किंवा खेळाचे मैदान तयार करणे याला जमिनीचा योग्य वापर म्हणता येणार नाही. म्हणून सर्व प्रथम कोणती जमीन कोणत्या उपयोगासाठी योग्य आहे याबाबतीत संपूर्ण जमिनीची पाहणी करावी व जमीन पाहणीचे कार्य संपल्यानंतर जमिनीच्या वापरासंबंधिची योजना तयार करावी व त्या योजनेनुसार जमिनीची लागवड करावी.

**४) भू—संरक्षण :—** जमिनीची सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी भू—क्षरणाच्या क्रियेला आळा घालून भू—रक्षणाच्या योजना अमंलात आणणे आवश्यक आहे. भू—क्षरणाच्या क्रियेमुळे जमिनीचा सुपीक भाग निघून जातो. जमीन निकामी होते. अशा जमिनीवर शेती करणे परवडत नाही. त्यामुळे अशी जमिन सोडून द्यावी लागते परिणामत: लागवडीखालील क्षेत्र कमी होते. लागवडीखालील क्षेत्रात घट होणे हे शेती विकासाच्या दृष्टीने फार घातक असते. म्हणून भू—क्षरणाची क्रिया ताबडतोब थांबवून भू—संरक्षणाची योजना अंमलात आणावयास पाहिजे.

**५) जंगलाचे क्षेत्र वाढविणे :—** भू—क्षरणाची क्रिया थांबविण्यासाठी व पावसाच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी जंगलाचे क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे म्हणून जमिनीचा प्रत्येक तुकडा शेतीच्या किंवा जंगलाच्या लागवडीखाली आणला गेला पाहिजे. जोपर्यंत ३३ टक्के भू—भाग जंगलाने व्याप्त होत नाही तोपर्यंत जंगले वाढविण्याची क्रिया सुरूच ठेवली पाहिजे.

**६) पिकांचा फेरबदल :—**काही जमिनीवर एक—दोन वेळा शेती केल्यानंतर तिची सुपीकता कमी होते म्हणून ती जमीन काही वर्षासाठी तशीच सोडून दिली जाते. अशी जमीन सतत लागवडीखाली ठेवावयाची

(32)

असेल तर तिची सुपीकता टिकून राहील असे प्रयत्न करावयास पाहिजे. यासाठी या जमिनीवर सतत कोणतेही एकच पिक न घेता पिकांचा फेरबदल करावयास हवा पिकाच्या फेरबदलामुळे जमिनीची सुपिकता टिकवून ठेवण्यात मदत होते.

**७) सखोल शेती व पाणी पुरवठा :–** भारतात विस्तृत शेतीची शक्यता कमी असल्यामुळे उपलब्ध कृषीयोग्य जमिनीवरच श्रम–भांडवलाच्या अधिकाधिक मात्रा लावून सखोल पध्दतीने शेती करणे आवश्यक आहे. परंतू संखोल पध्दतीने शेती करतांना आऱ्हासी उत्पत्ती नियमाची मर्यादा पडते. शेतीमध्ये आऱ्हासी उत्पत्ती नियम अंमलात येत असल्यामुळे या पध्दतीने शेती करणे एका मर्यादेपर्यंत फायदेशिर असते. त्यानंतर मात्र श्रम–भांडवलाच्या खर्चापेक्षा उत्पादन कमी येऊन शेती अलाभकारी होते. याशिवाय सखोल शेतीमध्ये दुसरी अडचण पाणी पुरवठ्याची आहे. भारतातील बहुतांश भागात पाऊस दोन ते तीन महिने पडतो. तोही कधी गरजेपूर्वी तर कधी गरज संपल्यानंतर पडतो म्हणून सखोल शेती करण्यासाठी नियमित पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. भारतीय अर्थव्यवस्था – मिश्रा एवं पुरी, हिमालया पब्लीकेशन हाऊस, नई दिल्ली.

२. भारतीय आर्थिक निती – डॉ. पी.डी. माहेश्वरी, डॉ. शिलचंद्र गुप्ता, कैलास प्रकाशन भोपाल.

३. आर्थिक निती व प्रशासन – डॉ. निलीमा देशमुख, कॉलेज बुक डेपो, जयपूर.

४. भारतीय स्टेट बँक वार्षिक रिपोर्ट– अध्यक्ष. मुख्य कार्यालय मुंबई.

५. आर्थिक सर्वेक्षण – संचालनालय – आर्थिक व सांख्यीकी संचालनालय.

६. कृषी सांख्यीकी – संचालक, कृषी संचालनालय, महा.

७. आर्थिक विकास एंव नियोजन – एस.बी. सिंग – एस चंद ॲन्ड कंपनी, दिल्ली.

८. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. जैन, साहित्य भवन, आग्रा.

९. योजना – शासकीय प्रकाशन – सुचना प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली.

१०. विविध समाचार पत्र.

११. भारतीय अर्थव्यवस्था– रमेश सिंह, M.C. Grawhill


**30**

# मराठवाड्यातील जिल्हा प्रशासनात अनुसुचित जातीतील महिलांचा सहभाग


**सिंधू गणेश गरुड**
संशोधक, लोकप्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

**डॉ. कल्पना एच. घारगे**
मार्गदर्शक, लोकप्रशासन विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय गेवराई, जि. बिड


**********

भारत देश हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहत असून भारताची एकात्मता टिकुन आहे. भारतात प्राचीन काळापासून जाती व्यवस्थेला महत्वपूर्ण स्थान आहे. भारतातील लोकशाहीमध्ये लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात व समाजातील सर्व घटकातील लोकांना समान सहभाग मिळणे आवश्यक आहे. या बाबींचा विचार करता भारतीय राज्यघटनेने अनुसुचित जाती जमाती आणि इतर मागास संवर्गातील लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व होण्यासाठी राखीव जागांची तरतुद करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक जातीतील महिलांना सुध्दा न्याय प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची तरतुद करण्यात आली आहे. यामुळे ख-या अर्थाने प्रशासकीय सामाजिक, राजकिय प्रक्रियेपासून वंचित असलेले सामाजिक समुह प्रशासकीय प्रक्रियेत सहभागी होण्यास मदत झाली आहे. भारतातील प्रशसकीय सेवेंचा विचार केला तर या ठिकाणी अनुसुचित जातीचे प्रमाण समाधानकारक स्वरुपाचे नाही. सच्चर समितीच्या अहवालानुसार देशामध्ये जवळपास ८८ लाख लोक सरकारी नोकरी करतात. यामध्ये अनुसुचित जाती व जमातीतील कर्मचा-यांची संख्या १५% आहे. देशातील सार्वजनिक उद्योगात १ कोटी ४० लाख लोक नोकरी करतात. त्यामध्ये अनुसुचितजाती व जमातीचे प्रमाण ६.४% आहे. राज्यसरकारच्या मालकीच्या उद्योगात ९% प्रमाण आहे. कार्मिक मंत्रालयाच्या अहवालानुसार इ.स.२०१६ मध्ये केंद्रशासनाच्या विभागातंर्गत कार्यरत एकूण ३२५७८१२ कर्मचा-यापैकी ६५९७६८ कर्मचारी अनुसुचित जातीतील आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये